| MHNB100020582021 | दाखल दिनांक | :- | ०८.१२.२०२१ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :- | ०८.१२.२०२१ |
| | निकाल दिनांक | :- | १५.०५.२०२६ |
| | कालावधी | :- | ०४ वर्ष. ०५ महिने. ०७ दिवस. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी : विजय. भि. शितोळे )

न्यायनिर्णय घोषित दिनांक – १५ मे, २०२६

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १२३०/२०२१**

**निशाणी क्र. ८ सोबत**

| **गुन्हा नोंद क्र. ४८१/२०२१** | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | महाराष्ट्र शासन मार्फत<br>अक्कलकुवा पोलीस ठाणे,<br>ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.एस.वळवी. |
| आरोपी | | वजेसिंग मानसिंग पाडवी,<br>वय– ५२ वर्षे, धंदा– मजुरी,<br>रा. विरपुर, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. एम.डी.वसावे |

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १२.०७.२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | १२.०७.२०२१ |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | ०८.१२.२०२१ |
| प्रतिकथन निश्चित केल्याचा दिनांक | ०५.०८.२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १०.१०.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | १५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वजेसिंग मानसिंग पाडवी | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१-अ प्रमाणे नोटीस | ०५.०८.२०२५ | महाराष्ट्र प्रतिबंधित कायदा कलम ६५(ई) अन्वये | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. | --- | --- |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

## अ. सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भगवान उदेसिंग पाडवी | पंच | ०८ पुढे |
| २. | आकाश वरदान वळवी | पंच | ०८ पुढे |

## ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |

## न्यायनिर्णय

## ( पारित दिनांक १५, मे २०२६ )

सदर खटल्यातील आरोपी हा महाराष्ट्र प्रतिबंधित कायदा कलम ६५(ई) नुसार न्यायचौकशीत आहे.

### सरकार पक्षाच्या खटल्याचा थोडक्यात सारांश असा की,

२. दि. १२.०७.२०२१ रोजी देविदास तुळशीराम नाईक (यापुढे फिर्यादी असे संबोधण्यात आले आहे.) महिला पो.स.ई आर.एस.महाजन, अ.स.ई मनोहर कोळी असे अक्कलकुवा पोलीस स्टेशनला हजर असताना पोलीस निरीक्षक शिंगटे यांना गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, विरपुर नाला रस्त्यावर एक इसम गावठी हात भट्टीची दारु कब्जात बाळगुन तीची चोरटी विक्री करीत आहे. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक शिंगटे यांनी सदर इसमावर कारवाई करणेबाबत आदेशित केल्याने महिला पो.स.ई महाजन यांनी दोन पंचांना बोलावुन त्यांना वरील बातमीची हकीकत सांगितल्याने ते पंच म्हणुन त्यांच्यासोबत येण्यास तयार झाले. त्यानंतर फिर्यादी, पोलिस पार्टी व पंच असे खाजगी वाहनाने निघुन विरपुर गावात जावुन थोड्या अंतरावर गाडी थांबवुन तेथुन पुढे पायी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी गेले असता, विरपुर नाला रस्त्यावर एक इसम मातीचे

दोन रांझण घेवुन बसलेला दिसला. त्यांना त्याचा संशय आल्याने त्याच्यावर १७.०० वाजता छापा टाकला असता त्या इसमाला जागीच पकडले. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव वजेसिंग मानसिंग पाडवी असे सांगितले. त्याच्या ताब्यात दोन मातीचे रांझण प्रत्येकी ४० लिटर प्रमाणे एकुण ८० लिटर गावठी हातभट्टीची अंबुस उग्रवासाची दारु मिळून आली. तेथे पोसई आर.एस.महाजन यांनी दोन पंचांसमक्ष तो मुद्देमाल जप्त करून त्याचा जप्ती पंचनामा केला. त्यानंतर सदर जप्त मुद्देमालातुन १८० मि.ली. एका लहान काचेच्या बाटलीत गावठी हातभट्टीची दारु सी.ए.नमुन्यासाठी काढुन घेतली व उर्वरीत मुद्देमाल हा पंचसमक्ष जागीच नाश केला. त्यानंतर फिर्यादीने घटनेची फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरून अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गु. र. क्र. ४८१/२०२१ अन्वये महाराष्ट्र प्रतिबंधित कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हयाची नोंद झाली. सदर गुन्हयाचा तपास पो.ना. श्री. के.एम.वळवी यांच्याकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी जप्ती पंचनामा प्राप्त करुन घेतला व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले तसेच इतर आवश्यक दस्तऐवज हस्तगत केले.

४. मी आरोपीविरूध्द त्याचे प्रतिकथन नि. ०८ वर नोंदवून त्याला त्याचे मातृभाषेत वाचून व समजावून सांगितले. आरोपीने त्याला गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन सदर खटल्याचा न्यायचौकशीचा पर्याय स्वीकारला.

५. आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविले नाही.

६. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही.एस.वळवी व

आरोपीतर्फे वकील श्री. एम.डी.वसावे यांचा युक्तीवाद ऐकला.

७. खालील मुद्दे माझे अवलोकनात असून त्यांचे निष्कर्ष मी खालील नमुद कारणमिमांसेच्या आधारे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. १२.०७.२०२१ रोजी १७.०० वा. चे सुमारास मौजे विरपुर नाला रस्त्यावर आरोपी स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीरपणे विनापरवाना दोन मातीचे रांझण प्रत्येकी ४० लिटर प्रमाणे एकुण ८० लिटर गावठी हातभट्टीची दारूची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगताना मिळून आला हे अभियोगपक्षाने शाबीत केले काय? | नाही. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत –</u>**

८. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र. १ भगवान उदेसिंग पाडवी हे पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी त्यांच्या सरतपासात सांगितले की, दि. १२.०७.२०२१ रोजी पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केलेला नाही. सदर साक्षीदार हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्याने त्यांना उलटतपासणीत विचारता येणारे प्रश्न विचारले असता देखील त्यांनी अभियोगपक्षास उपयुक्त होईल असे कुठलेही कथन केलेले नाही.

९. साक्षीदार क्र. २ आकाश वरदान वळवी हे पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी त्यांच्या सरतपासात सांगितले की, दि. १२.०७.२०२१ रोजी पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केलेला नाही. सदर साक्षीदार हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्याने त्यांना उलटतपासणीत विचारता येणारे प्रश्न विचारले असता देखील त्यांनी अभियोगपक्षास उपयुक्त होईल असे कुठलेही कथन केलेले नाही.

१०. अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीचा पुरावा नोंदविलेला नाही. त्यामुळे फिर्याद ही सिध्द झालेली नाही. तसेच जप्ती पंचनाम्यावरील पंचांनी मुद्देमाल हा त्यांच्यासमक्ष जप्त केल्याचे त्यांनी सांगितले नाही. तसेच अभिलेखावर रासायनिक विश्लेषण अहवाल उपलब्ध नाही. एकंदरीत आरोपीविरूध्द कुठलाही गुन्हादर्शक पुरावा नाही. सबब, दि. १२.०७.२०२१ रोजी १७.०० वा. चे सुमारास  मौजे विरपुर नाला रस्त्यावर आरोपी स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीरपणे विनापरवाना दोन मातीचे रांझण प्रत्येकी ४० लिटर प्रमाणे एकुण ८० लिटर गावठी हातभट्टीची दारूची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगताना मिळून आला ही बाब सिध्द होत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ साठी –</u>**

११. मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्याने आरोपी हा महाराष्ट्र प्रतिबंधित कायदा कलम ६५(ई) मधून निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. या अनुषंगाने मी मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१} आरोपी **वजेसिंग मानसिंग पाडवी** यांची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यामधून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२} आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३} खटल्यातील जप्त मुद्देमाल हा जागेवर नाश केल्याने त्याबाबत आदेश नाही.

४} आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४३७(अ) अनुसार रक्कम रुपये १५,०००/– चे बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीनपत्र देऊन सरकार पक्षाने सदर प्रकरणात अपील केल्यास त्यात हजर राहण्याची ग्वाही द्यावी.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आले.)

Digitally signed by VIJAY BHIMRAO SHITOLE
Date: 2026.05.15 13:16:02 +0530

ठिकाण :– अक्कलकुवा

दिनांक :– १५.०५.२०२६

( **विजय भि.शितोळे** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा
जि. नंदुरबार

## दा ख ला

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | हार्दिक दौलतभाई वाघ |
| न्यायालयाचे नाव | :– | दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार. |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | :– | १५.०५.२०२६ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | १५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | १५.०५.२०२६ |